नि.दि.दावा क्र.१३/२०१९

रामकृष्ण तारापुर –वि.– सविताबाई पल्हाडे

नि.क्र. ५० लगत

**वादीचे साक्षीदार क्र. १ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादीचे वकील श्री. जी. डी. ठाकरे यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

१९. वाद मिळकतीचा जुना नकाशा व टिपण उताऱ्यावर वाद मिळकतीचे एकुण क्षेत्रफळ २० आर दाखविले आहे की काय हे मला माहिती नाही.

२०. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीच्या ५ गुंठ्यावर कंपाऊंड करुन बोर्ड लावला होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या ५ गुंठ्यांवर प्रतिवादीचा ताबा त्यांच्या वडीलांनी ५ गुंठे दिल्यापासून आहे व प्रतिवादी ५ गुंठ्यावर तेव्हापासून राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी दावा मिळकतीवर राहू नये यासाठी मी त्यांच्याविरोधात बऱ्याच वेळा पोलीस स्टेशनला तक्रारी केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर प्रत्यक्ष माझा ताबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांचे भाऊ व वडीलांनी दावा मिळकती कधीही माझ्या ताब्यात दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या ताब्यातून ५ गुंठे जमीन हडप करण्यासाठी व हिसकावून घेण्यासाठी मी त्यांच्या विरुध्द खोटा दावा दाखल केलेला आहे. जुन्या हक्कनोंदी, जुने फेरफार व जुने ७/१२ वर दावा मिळकतीचे क्षेत्र २० आर दर्शविलेले आहे की काय हे मला माहिती नाही. कर आकारणी १.३० रुपये दर्शविलेली आहे की काय हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर माझा कधीही ताबा नव्हता व मी आज खोटी साक्ष देत आहे. आता मला मोजणी शिट दाखविण्यात आली. ती मीच न्यायालयात दाखल केलेली आहे. सदर मोजणी शिट उलटतपासात दाखविण्यात आल्यामुळे व ती मोजणी शिट वादीला मान्य असल्यामुळे मोजणी शिटला **निशाणी क्र. ७७** देण्यात येते. आता मला मोजणीची 'अ' प्रत दाखविण्यात आली. सदर मोजणी शिटची 'अ' प्रत मला मान्य नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०९.०९.२०१२ रोजी मी मोजणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस १५ आर व ५ आर असे क्षेत्रफळ मोजणी अधिकाऱ्याने दर्शवून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस पंचनामा झाला होता व माझा जबाब सुध्दा घेण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामध्ये व माझ्या जबाबामध्ये १५ आर व ५ आर असे वेगवेगळे क्षेत्रफळ

दर्शविण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर माझा ताबा नसतांना सुध्दा न्यायालयात खोटे प्रकरण दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| दि.न्या.क.स्तर, शेगांव कोर्ट क्र.१ ले, | दि.न्या.क.स्तर,शेगांव कोर्ट क्र.१ ले, |
| दि.०६.०५.२०२५ | दि.०६.०५.२०२५ |